VOLUME - IX ... - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रासंगिकता

**प्रा. सौ. सुपेकर वैशाली प्रशांत**
सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर.

ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक नाव नसून तो एक विचार झालेला आहे. इतकेच नाही तर आज ती एक अशी चळवळ बनली आहे. समाजकारण, राजकारण अशा क्षेत्रामध्ये परिवर्तन करण्याची ताकद त्यांच्या विचारांमध्ये आहे. भारतीय समाज हा वर्णव्यवस्थेवर आधारित होता. व्यक्तीला वर्णव्यवस्थेच्या चौकटीमध्येच जीवन जगावे लागत होते. क्षत्रीय, वैश्य आणि क्षुद्र या वर्णाची सामाजिक बांधणी करण्यात आलेली होती. यातूनच जातीव्यवस्था अस्तित्वात सवर्ण आणि अस्पृश्य अशी विभागणी करण्यात आली. आणि अस्पृश्य समाजावर वर्षानुवर्षे अन्याय-अत्याचार झाला. होणाऱ्या अत्याचाराला दाद मागण्यासाठी कोणतीही अधिकृत अशी समाजमान्य व्यवस्था नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मात्र अस्पृश्यता ही सामाजिक समस्या आहे असे मत प्रथम मांडले. हिंदू धर्म आणि त्याची शिकवण हीच अस्पृश्यांच्या अधोगतीस जबाबदार असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला.त्यांनी संबंध हयातभर मानवमुक्तीसाठी लढा दिला. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, कायदा, इतिहास इ. विविध विषयांचा अभ्यास मानवाला केंद्रस्थानी ठेवून त्यांनी भारतात सामाजिक न्यायाची सुरुवात करणे, ही त्यांची अतुलनीय कामगिरी आहे. इतकेच नाही तर ते आर्थिक विषयाचे तज्ञ होते. राज्य समाजवादाची पुनर्रचना, शेतमजुरांना मिळणाऱ्या विविध सोई, चलनपुरवठा, दारिद्र्य आर्थिक पिळवणूक अनेक विषयांचा त्यांनी अभ्यास केला.

या शोध निबंधात त्यांच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण त्यांनी जे तत्वज्ञान मांडले आहे, त्यामध्ये सर्वसामान्य लोकांच्या विकासाचा विचार त्यांनी केलेला आहे. मानवी हक्क, स्त्री-पुरुष नैतिक मानवी मूल्ये यांच्या निर्मितीवर भर देणारे त्यांचे विचार आहेत. रानडे, गांधी आणि जीना, थॉट्स ऑन पाकिस्तान, स्टेट्स अँड मायनोरीटीस, भारतीय संसद सभा आणि त्यांची भाषणे सर्वांमधून त्यांचे राजकीय विचार स्पष्ट व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध त्यांनी त्यांच्या विचारमधून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**लोकशाहीबाबतचे विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. लोकशाहीचे तात्विक अधिष्ठान आणि कार्यपद्धती त्यांनी पुष्कळ विवेचन केले आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनात रक्ताचा एकही थेंब न सांडता क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात ते केवळ लोकशाहीमुळेच. लोकशाहीचा कारभार करण्याचा अधिकार ज्यांना प्राप्त झाला आहे, अशा शांततेचा पुरस्कार करून सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित केली तर ते लोकशाहीचे खरेखुरे सेवक आहेत, असे मत होते. राजकीय क्षेत्रात जेवढ्या उत्कटतेने लोकशाहीचा आग्रह धरला जातो, तेवढा तो सामाजिक व आर्थिक क्षेत्रात

60

धरला जात नाही. लोकशाहीची व्यवस्था ही स्वातंत्र्य,समता,बंधुता या तत्वांचा पुरस्कार केला जातो. भाबासाहेब आंबेडकर हे संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करतात, कारण या माध्यमातून लोक आपले प्रतिनिधी नियडून देतात, आणि हे प्रतीनिधी जनतेच्या वतीने राज्यकारभार करतात. वंचित घटकांच्या विकासाचा विचार फक्त लोकशाहीमध्येच होऊ शकतो. संसदीय पद्धतीमध्ये आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते. शिस्त,सहकार्य,समर्पण या गुणांची जोपासना संसदीय शासन पद्धतीमध्ये होते. वंशपरंपरेने चालत आलेली सत्ता सर्वसामान्यांना सतेत वाटा मिळू देत नव्हती, मात्र लोकशाही मध्ये सत्तेवर नियंत्रण तर ठेवता येतेच आणि सामान्य लोकांना सत्तेत सामील होण्याची संधी मिळते. सत्ताधीश पक्षावर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्ष अस्तित्वात असतो. सरकारला लोकाणूवर्ती राहण्यास विरोधी पक्ष भाग पाडत असतो. जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करणारे सरकार असेल तर निवडनुकीमध्ये दुसऱ्या पक्षाचे सरकार जनता निवडून आणू शकते. संसदीय लोकशाहीच्या काही उणिवा देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगताता,त्यांच्या मे संसदीय लोकशाहीमध्ये घडून येणारे बदल अत्यंत संथ गतीने होणारे असतात.त्यामुळे आवश्यकता असताना लवकर निर्णय घेता येत नाही. म्हणूनच इटली, स्पेन, जर्मनी या देशांमध्ये लोकशाहीला कंटाळून जनतेने हुकूमशाहीचे स्वागत केले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनतेला असा सल्ला देतात की, संसदीय लोकशाहीच्या उणिवा जाणून घेऊन, त्यामध्ये सुधारणा करण्यावर भर द्यावा. आणि ही पद्धत व्यवस्थित समजून घ्यावी. केवळ संस्थात्मक बदल, संवैधानिक विशोधने आणि न्यायालयाची सक्रियता ठेवून संसदीय लोकशाही सुरक्षित ठेवता येणार नाही,त्यासाठी मूलगामी उपाय करावे लागतील. बहुमतवाल्यांच्या नावाखाली अल्पसंख्याकांना असुरक्षित वाटणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक पातळीवर सदसादविवेकबुद्धि जागृत ठेवणे संसदीय लोकशाहीमध्ये आवश्यक आहे.

**२. उदमतवादविषयक विचार**

यूरोपच्या राजकरणात १९व्या शतकात उदमतवादाने खूप महत्वाची भूमिका बजावली. भाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय व सामाजिक विचारांचा अभ्यास करताना त्यांच्या विचारांवर उदरमतवादाचा प्रभाव पडलेला दिसतो. परदेशात शिक्षण घेत असताना उदारमतवादी विचारांचा संस्कार त्यांच्यावर झालेला होता. बर्क, जे. एस. मिल, बूकर टी वाशिंग्टन, भगवान बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले आणि फ्रान्स-अमेरिका राज्यक्रांतीच्या वैचारिक प्रेरणांनी त्यांचा उंदारमतवादी दृष्टिकोन भक्कम केला. परंतु पुढे उदरमतवादाची त्यांनी संकल्पना पाश्चात्यापेक्षा भिन्न स्वरूपात दिसते.भारतीय समाजाच्या संदर्भात पाश्चात्य उदामतववादी विचार थोडा कमी पडतो असे त्यांचे मत होते. नीरपवाद हक्क, बाजारधीष्ठित मुक्त अर्थव्यवस्था, राज्याचा कमीत कती हस्तक्षेप या गृहितकृत्यावर आधारित पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही विचारसरणी आधारलेली होती, त्यातील सर्व जसेस तसे विचार बाबासाहेब आंबेडकर यांना मान्य नव्हते. उदरमतवादीतील व्यक्तीचे हक्क,स्वातंत्र्य, प्रतिष्ठा हे त्यांना मान्य होते परंतु व्यक्ती आणि समाज यांचे परस्परसंबंध याबद्दल त्यांच मत भिन्न होते. उदरमतवादातील राजकीय व्यवस्थेचे स्वरूप-आणि कार्यप्रणाली बहुतांशपणे त्यांना मान्य होती म्हणून संसदीय लोकशाही,स्वतंत्र न्यायप्रणाली, घटनात्मक नीतीमत्ता त्यांना मान्य होती म्हणून संसदीय लोकशाही,स्वतंत्र न्यायप्रणाली,घटनात्मक नीतीमत्ता त्यांना मान्य होती मात्र उदारमतवादी



Scanned with OKEN Scanner

...विचार त्यांना मान्य नव्हते. उदारमतवादातील अनिर्बंध अर्थव्यवस्था आणि सरकारचा अहस्तक्षेप हे अमान्य ... ते राज्य समाजवादाचा पुरस्कार करतात. समाजवादातील आर्थिक समता व न्याय आणि नियोजनाची आवश्यकता त्यांनी ... होती. समाजवादाच्या आर्थिक समता व न्याय आणि नियोजनाची आवश्यकता त्यांनी स्वीकारली होती ... उद्देशामध्ये समाजातील सर्व नागरिकांमध्ये समतेच्या मूल्यांची भावना, एकमेकांचे आर्थिक शोषण न करणे, ... स्वतःचा विकास करण्याची मुभा असणे, उत्पादनाच्या साधनावर सर्वांची समान मालकी असणे, या बाबी त्यांना ... होत्या.

## ...वादविषयक विचार

भारतीय परिस्थितिच्या अनुषंगाने त्यांचे समाजवादी विचार मांडले होते. भारतात १९व्या शतकात औद्योगिक ... चालना मिळाली. यातूकन गिरणी उद्योग भरभराटीला आला. परंतु ही भरभराट कामगारांच्या शोषणातून झाली ... रचना भारतात यशस्वी होणार नाही, असे बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. कारण भारतातील सामाजिक व ... परिस्थिती पूर्ण वेगळी आहे. येथे आर्थिक स्वातंत्र्य दिले तर त्याचा फायदा मूठभर लोकांनाच होईल, त्यातून संपत्तीचे ... होईल आणि श्रीमंत अधिक श्रीमं आणि गरीब अधिक गरीब होतील, म्हणून त्यांनी राष्ट्रीय समाजवादाचा मार्ग ... असा समाजवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी काही मार्ग सांगितले. शासनाने काही महत्वाचे उद्योगधंदे स्वतःच्या ... घ्यावेत. आर्थिक नियोजन पक्के असेल तर राज्यसत्ता उत्पादनाच्या क्षेत्रात प्रचंड क्रांति घडवून आणू शकते. ... बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी अर्थव्यवस्थेचे नियंत्रण व्हायला हवे. समाजवादी विचारसरणीत मानवी ... नियमनात अर्थव्यवस्थेचे स्थान महत्वाचे मानण्यात येते.

१ एप्रिल १९४७ मध्ये मुंबई येथे एक सत्काराच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "राष्ट्रीय ... अवलंब करणे हा एकच कार्यक्रम राष्ट्रासमोर आहे." असा कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी शासनाने काही ... उद्योगधंदे आपल्या ताब्यात घेतले तर त्यातून आर्थिक शोषणाला प्रतिबंध बसेल. भारतात समाजवादाचा प्रश्न आर्थिक ... आहे असे त्यांना वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजवाद या ... सुरेख संगम झाल्याचे दिसून येते.

## ...राज्यघटना विषयक विचार

भारतीय राज्यघटना मसुदा विषयक समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांनी जे कार्य केले, ते अतिशय महत्वपूर्ण ... आहे. संविधानाच्या प्रत्येक कलमावर घटना समितीमध्ये सविस्तर चर्चा त्यांनी केली आहे. कच्चा मसुदा तयार ... पासून ते राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे अवघड काम त्यांनी पार पाडले. २१ फेब्रुवारी १९४८ रोजी घटनेचा ... अध्यक्षांना सादर करण्यात आला. व लोकांची मते आजमावण्यासाठी तो ८ महीने खुला ठेवण्यात आला. संविधानाच्या ... अंगाचे, स्वरूपाचे, संकल्पनेचे त्यांनी सखोल विश्लेषण केले, टीकाकारांना समर्पक उत्तरे दिली. संविधान सभेत त्यांनी

62

घटनेच्या निर्मिती करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुवादी विषम कायद्यांना सुरुंग लावला. अनेक पक्ष, धर्म,पंथ,आस्तित्वात असताना भारत हे एक राष्ट्र म्हणून उभे राहिले त्याचे श्रेय आंबेडकरांना जाते.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार पहिले असता एक राजकीय विचारवंत म्हणून स्पष्ट प्रतिमा निर्माण होते. राजकीय विचार ते केवळ राजकीय दृष्टिकोणातून न मांडता एकूणच समाजाच्या आमुलाग्र परिवर्तनाचा विचार करतात. त्यामुळे राजकीय सत्ता, लोकशाही, राष्ट्रवाद,समाजवाद इ. विषयक त्यांचे विचार इतर विचारवंतांपेक्षा वेगळे ठरतात. भारतीय राज्यघटना लिहून त्यांनी सर्व वर्गाला राष्ट्रीय एकता व अखंडतेच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेतले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना सांगितल्या. सर्व वर्गाच्या विकासाची हमी ज्या राज्यघटनेच्या माध्यमातून दिली, त्या राज्यघटनेची अमलबजावणी होण्याची गरज आहे.

**संदर्भ**

१. गजभिये शेषराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय तत्वज्ञान.
२. भोळे भास्कर, डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन,पुणे,पृ. ५९
३. निंबाळकर वामन,डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, प्रबोधन प्रकाशन,पृ.६५-६६
४. देशपांडे म. द., डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार., पृ. २०.
५. बाचल वि. मा.,भारतीय राजकीय विचारवंत, अनिरुद्ध प्रकाशन, पृ.४४
६. कसबे रावसाहेब,आंबेडकर आणि मार्क्स,सुगावा प्रकाशन,पृ.१०७



Scanned with OKEN Scanner